# “महाराष्ट्रातील बदलते राजकारण विशेष संदर्भ : कोल्हापूर जिल्हा”

**श्री शरद विठ्ठल पाटील** (सहा. प्राध्यापक) राज्यशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर

---

**सारांश :-**

महाराष्ट्रातील राजकारण हे भारतीय राजकारणावर प्रभाव टाकणारे राजकारण आहे. २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनुसार, राज्यात प्रामुख्याने भाजप, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस तीन राष्ट्रीय पक्ष आणि शिवसेना हा एक प्रादेशिक पक्ष असे हे ४ मुख्य भूमिकेतील पक्ष आहेत. २०१८ मध्ये वंचित बहुजन आघाडी या पक्षाची स्थापना करण्यात आली. १५ मार्च २०१९ रोजी, भारतीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या राजकीय पक्षांच्या यादीनुसार महाराष्ट्रात एकूण १४५ नोंदणीकृत पक्ष आणि २ प्रादेशिक/राज्यस्तरीय पक्ष आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शिवसेना हे राज्यातील दोन प्रादेशिक पक्ष आहेत. तर भारतामध्ये एकूण २,३३४ राजकीय पक्ष असून, यापैकी ७ राष्ट्रीय पक्ष, २६ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर २,३०१ नोंदणीकृत पक्ष आहेत.२०१४ च्या निवडणूकीच्या आधी आणि निकालानंतर ते २०२४ पर्यंत महाराष्ट्रातील राजकारणाचे राजकीय संदर्भ बदलले दिसून येतात.

**प्रस्तावना :-**

सुधारणावादी चळवळी आणि मागण्या या संबधित समाजातून निर्माण व्हाव्यात अशी पंडित जवाहरलाल नेहरूंची मूळ भूमिका काँग्रेसच्या राजकारणात सुरुवातीस प्रभावी राहिली. सुधारणावादी चळवळीची बाजू घेण्याच्या ऐवजी मतांच्या बेरजेकरिता काँग्रेसच असुरक्षिततेची भावना पसरवून मुसलमान परंपरावाद्यांची पाठराखण करते असा समज खास करून सुशिक्षित शहरी मुसलमानेतर मतदारांमध्ये प्रबळ होत गेल्याने व डावे विरोधी पक्षसुद्धा सुधारणावादी भूमिका घेत नाहीत हे दिसल्याने उजव्या हिंदुत्ववादी गटांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षांची मतदानाची टक्केवारी वाढत गेली व याचा परिणाम कालांतराने प्रमुख विरोधी पक्षांची भूमिका डाव्या पक्षांच्या हातातून जाऊन शिवसेना आणि भाजप युतीच्या वाट्यास आली. काँग्रेसच्या मराठा-महार-मुस्लिम-आदिवासी या समीकरणाबाहेर असलेला एक खूप मोठा समूहही शिल्लक राहतो. शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांचा भर उच्च आणि ओबीसींमधील काही जाती यांवर आहे.

**उद्दिष्टे :-**

१) कोल्हापूर जिल्हातील राजकीय परिस्थिती अभ्यासणे.

२) महाराष्ट्राच्या बदललेल्या राजकीय परिस्थितीचा कोल्हापूरच्या राजकारणावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन स्रोत**

प्रस्तुत शोधनिबंधात लेखनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आला असून यातील स्पष्टीकरनासाठी इंटनेट,संदर्भग्रंथ,वर्तमान पत्र उपयुक्त मासिकांचा योग्य प्रमाणात उपयोग करण्यात आला आहे.

**आशय विश्लेषण**

**महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती.**

गेले 50 वर्षात राष्ट्रीय पातळीवर घडलेल्या घटना राष्ट्रीय पक्षांची झालेली मोडतोड आणि पुनर्गठण समाजवादाकडून जागतिकीकरणाकडे झालेला भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रवास. रशिया प्रणित पंचवार्षिक नियोजन स्वीकारूनही शेवटच्या माणसापर्यंत विकासाच्या लाभ पोहोचण्यात सातत्याने आलेली अपयश. मंडळ आयोग आणि अयोध्या सारखे जाती व धर्म यांना केंद्रस्थानी असणारे प्रश्न या सर्व घटकांचा महाराष्ट्राच्या राजकारणात सतत परिणाम होत गेला आणि या प्रत्येक धक्क्यातून महाराष्ट्राचे राजकारण बदलत गेले. राष्ट्रीय पातळीवरील घटनांचा ही परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर झाला महाराष्ट्राच्या राजकारणात स्वातंत्र्यपूर्वी पासूनच काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. स्वातंत्र्य महाराष्ट्र राज्य झाल्यानंतर 1976 पर्यंत हे वर्चस्व कायम राहिले प्रचंड मोठ्या वटवृक्षाच्या छायेखाली इतर झाडे झुडपे वाढू शकत नाहीत हा निसर्ग नियम आहे. त्यातच कम्युनिस्ट समाजवादी पक्ष शेकाप हे १९५९ मध्ये प्रमुख असलेले पक्ष काँग्रेसचीच विचारणारा कमी अधिक प्रमाणात मांडणारे पक्ष होते. वेगळा हिंदुत्वाचा विचार मांडणारा हिंदू महासभा हा पक्ष संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभागी असला तरी नंतर तो लयाला गेला आणि त्याचा विचाराचा जनसंघ हा नवा पक्ष उद्याला आला पण डाव्या पुरोगामी विचाराच्या पक्ष पक्षांच्या गर्दीत जनसंघ फार मोठे स्थान मिळू शकला नाही. आणीबाणीच्या नंतर महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष फुटला आणि नव्याने तयार झालेल्या राजकीय अवकाश आधी जनता पक्षाने आणि नंतर तिसरी आघाडी व भारतीय जनता भरून काढला हे कळलं सुद्धा नाही.

**१) कोल्हापूर जिल्हातील राजकीय परिस्थिती अभ्यासणे.**

कोल्हापूर जिल्ह्यात एकूण २ लोकसभा व १० विधानसभा मतदारसंघ आहेत. लोकसभा मतदारसंघ : कोल्हापूर, हातकणंगले. तर विधानसभा मतदारसंघ : चंदगड,राधानगरी, कागल,कोल्हापूर दक्षिण, कोल्हापूर उत्तर, करवीर, शाहूवाडी, हातकणंगले, इचलकरंजी, शिरोळ आहेत. तसेच ६७ जिल्हा परिषद मतदारसंघ व १३४ पंचायत समिती मतदारसंघ जिल्ह्यात आहेत. सहकारी चळवळीच्या बाबतीत कोल्हापूर महाराष्ट्रातील आघाडीच्या जिल्ह्यापैकी एक आहे. सहकारी चळवळीमुळे जिल्ह्यातील

विविध क्षेत्रात क्रांतिकारी विकास झाला आहे. जिल्ह्यात सुमारे ९६२४ सहकारी संस्था आहेत. जवळजवळ ३१.२१ लाख लोक त्यांचे सदस्य आहेत. सर्व संस्थांकडे मिळून एकंदर ३६४.२६ कोटी रुपयांचे भांडवल आहे. यातील २५.९५ कोटी सरकारी तर ३३८.३२ कोटी प्रत्यक्ष संस्थांचे आहेत. विविध सहकारी संस्थांपैकी सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध उद्योग, सहकारी कापड गिरण्या आणि सहकारी पतसंस्था या मोठे काम करताना दिसतात. सहकारी क्षेत्रारील 'कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक' ही सर्वात मोठी सहकारी बँक आहे तिचा प्रभाव कोल्हापूर जिल्ह्यातील राजकारणावर पडलेला पहावयास मिळतो. कोल्हापूरात ज्या मतदारांनी लोकप्रतिनिधींना मतदान केले, त्यांनाच गृहीत धरून संबंधितांनी काही निर्णय घेतला तर तो लोकांच्या पचनी पडत नाही, हा कोल्हापूरचा राजकीय इतिहास आहे. त्यातून जिल्ह्यातील अनेक दिग्गजांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला. शिवसेनेत पडलेली फूट, त्यात जिल्ह्यातील आमदार, खासदारांनी घेतलेला निर्णय यावरून आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत काय होणार याविषयी उत्सुकता आहे.

कोल्हापूर शहरातून १९९० मध्ये शिवसेनेच्या तिकिटावर कै. दिलीप देसाई आमदार झाले. पण, दोन वर्षातच त्यांनी शिवसेना सोडली. त्यांच्या या निर्णयाविरोधात मोठे आंदोलन झाले. पुढच्या निवडणुकीत त्यांच्या पत्नी श्रीमती शिवानी देसाई काँग्रेसच्या तिकिटावर रिंगणात उतरल्या, पण त्यांचा पराभव झाला. सलग तीनवेळा एकाच पक्षाच्या तिकिटावर वेगवेगळया मतदारसंघातून विजयी झालेल्या एका आमदारांनी अचानक पक्ष बदलला. पण, त्यांनाही लोकांनी नाकारले. मी एवढी विकासकामे केली म्हणून मी घेईल तो निर्णय लोकांनी मान्य करावा ही मानसिकता कोल्हापुरात चालत नसल्याची ही दोन ठळक उदाहरणे. २००९ च्या लोकसभा निवडणुकीतही हेच पहायला मिळाले. वयोमानानुसार राष्ट्रवादीचे विद्यमान खासदार असलेल्या कै. सदाशिवराव मंडलिक यांना पक्षाने उमेदवारी नाकारली. पण ते अपक्ष लढले आणि जिंकले. कै. मंडलिक यांना विश्वासात घेऊन उमेदवार ठरवला असता किंवा त्यांनाच पक्षाची उमदेवारी देऊन त्यावेळी पक्षाचे उमेदवार राहिलेल्या माजी खासदार संभाजीराजे यांना अपक्ष उतरवून बळ दिले असते तर कदाचित वेगळाही निकाल लागला असता. कागलचे माजी आमदार संजय घाटगे सहावेळा वेगवेगळ्या पक्षातून लढले. पण त्यांनाही लोकांनी स्वीकारले नाही. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत कोल्हापुरातून खासदार धनंजय महाडिक यांना राष्ट्रवादीची उमेदवारी मिळाली, ते जिंकलेही. पण त्यानंतर राष्ट्रवादीसोबत असलेली त्यांची नाळ तुटली. पक्षाच्या व्यासपीठावरही त्यांचा वावर पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या दौऱ्यापुरताच राहिला. त्यांची जवळीक भाजपशी वाढली. २०१९ ला पक्षाने त्यांना उमदेवारी दिली. पण पर्वानुभव पाहता लोकांनी त्यांची उमेदवारी आवडली नाही आणि ते पराभूत झाले. कामाच्या संपर्काच्या आणि यंत्रणेच्या पातळीवर प्रबळ असलेल्या आमदार सतेज पाटील यांनाही याच कारणाने २०१४ च्या निवडणुकीत पराभवाची चव चाखावी लागली.

येणाऱ्या लोकसभेच्या निवडणूक गेल्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाच्या चिन्हावर प्रा. संजय मंडलिक, धैर्यशील माने खासदार झाले. पण जून २०२२ मध्ये झालेल्या सत्तांतरात त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची वाट धरली. माने यांना या निर्णयाविरोधातील कार्यकर्त्यांच्या रोषाला अलीकडेच सामोरे जावे लागले. प्रा. मंडलिक यांनीसुद्धा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची वाट धरली. आमदार प्रकाश आबिटकर, राजेंद्र पाटील-यड्रावकर, माजी आमदार चंद्रदीप नरके यांनाही आपआपला गड राखताना कष्ट घ्यावे लागतील अशी स्थिती कोल्हापूर जिल्यातील राजकारणाची झाली आहे.

**२) महाराष्ट्राच्या बदललेल्या राजकीय परिस्थितीचा कोल्हापूरच्या राजकारणावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.**

कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेची महाविकास आघाडीने एकत्र तर कधी भाजप निवडणूकीच्या राजकारणात एकत्र येताना दिसून येतात. कोल्हापूर जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवडणूक महाविकास आघाडी असो किंवा भाजप हे पक्ष आपली सत्ता निर्माण होण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येतात. या पार्श्वभूमीवर कोल्हापूरच्या राजकीय हालचाली होत असतात. राज्यात सत्तेत आलेल्या महाविकास आघाडीच्या फॉर्म्युल्यानंतर आता अडीच वर्षे विरोधात राहिलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादीने शिवसेनेच्या साथीने जिल्ह परिषदेत सत्ता काबीज करण्याची तयारी सुरू केली. तर दुसऱ्या बाजूला भाजपने स्थानिक आघाड्यांना एकत्र करत सत्ता टिकवून ठेवण्यासाठी जोरदार प्रयत्न केले आहेत. राज्यात सत्तेत आलेल्या महाविकास आघाडीमुळे भाजपला जिल्हा परिषदेवरील आपली सत्ता टिकवणे प्रतिष्ठेचे बनले आहे. कधीकाळी एखादा जिल्हा परिषद सदस्य असलेल्या भाजपला अडीच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत तब्बल 14 जागा मिळाल्या. काँग्रेसलाही या निवडणुकीत 14 जागा मिळाल्या असल्या तरी राष्ट्रवादी बरोबरच स्थानिक आघाड्यांना एकत्र घेण्यात काँग्रेस मागे पडली आणि इतिहासात पहिल्यांदाच कोल्हापूर जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा फडकला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेबरोबरच इतर स्थानिक आघाड्यांना बरोबर घेऊन भाजपने 34 आकडा गाठून आपलं बहुमत सिद्ध केलं.

2017 मध्ये झालेल्या निवडणुकीतील पक्षीय बलाबल भाजप 14, काँग्रेस,14, राष्ट्रवादी 11, शिवसेना 10, जनसुराज्य 6, इतर स्थानिक आघाड्या आणि अपक्ष 11 यातील काँग्रेस राष्ट्रवादी वगळता इतर स्थानिक आघाड्यांनी भाजपला पाठिंबा दिला होता. ज्यामध्ये राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचाही समावेश होता. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील राजकीय संदर्भ बदलले आहेत. त्यामुळे सत्ता टिकवणे भाजपसाठी अडचणीचं बनलं आहे. जिल्हा परिषद निवडणुकीनंतर अवघ्या दीड वर्षात स्वाभिमानीने भाजपविरोधात भूमिका घेतली तर विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेनाही भाजप विरोधात आहे. याशिवाय

भाजपनं शब्द पाळला नसल्याने स्थानिक आघाड्यांमध्ये ही अस्वस्थता आहे. स्वाभिमानी भाजप विरोधातच असेल असं सांगत माजी खासदार राजू शेट्टी यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. दहा सदस्य असलेली शिवसेना या सत्तेच्या तिढ्यामुळे किंगमेकर बनली आहे आशी परिस्थिती कोल्हापूर जिल्हापरिषदेत निर्माण झाली आहे. राज्यपातळीवर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजीत पवार गटाने भाजपशी संधान बांधण्याच्या घेतलेल्या भूमिकेनंतर त्याचा जिल्ह्यातील राजकारणावर त्याचा परिणाम झाल्याचे दिसून येते. या घडामोडीमुळे स्थानिक कार्यकर्ते संभ्रमावस्थेत सापडले आहेत. तालुस्तरावरील राजकीय समिकरणेही बदलली आहेत. वरिष्ठ पातळीवर नेत्यांनी भूमिका घेतल्याने गेले अनेक वर्षे एकमेकांचे दोन पक्षातील कट्टर विरोधक राहिलेल्या स्थानिक नेत्याची कोंडी झाली आहे. या घडामोडीचे परिणाम आगामी विधानसभा निवडणुकीत उमटणार हे निश्चीत! यानुसार कोल्हापूर जिल्हातील तालुकानिहाय खालीलप्रमाणे परिणाम दिसून येत आहे. करवीर मध्ये नरकेंना फायदा, ‘पी.एन" यांच्याशीच झुंज राज्यातील घडामोडीचे परिणाम विधानसभेला दिसतील. भाजपबरोबर, शिंदे गट म्हणजे नरके गट आणि मुश्रीफ गट एकत्र आल्यास विधानसभेला चंद्रदीप नरके यांची ताकद वाढून नरके विरुद्ध काँग्रेसचे पी.एन. पाटील यांच्यात पुन्हा काटा लढत होईल. नेत्यांच्या कोलांटउड्या कितीही असू द्या, आम्ही एकनिष्ठ आहोत अशा प्रतिक्रिया सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांत आहेत. शिवसेनेचे चंद्रदीप नरके शिंदे गटात गेले. त्याचा त्यांना फारसा लाभ होणार नाही अशी चर्चा होती. आता मात्र बदलत्या राजकिय घडामोडीमुळे नरके गटात उत्साह आहे. बंडाळीचा नरके कितपत फायदा उठवणार ही वेळ ठरवणार आहे. सध्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी तटस्थाची भूमिका व्यक्त केली. विधानसभेला पुन्हा महाविकास आघाडी झाल्यास काँग्रेसला फायदा होईल.

इचलकरंजी शहर नव्या घडामोडीमुळे नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. महाविकास आघाडी झाल्यास काँग्रेसला फायदा होईल आशी शक्यता निर्माण झाली आहे. इचलकरंजी राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर इचलकरंजीतील पक्षाअंतर्गत दोन्ही गटासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. माजी आमदार अशोक जांभळे आणि मदन कारंडे असे दोन्हीही अजित पवार व हसन मुश्रीफ यांच्याच मार्गदर्शनाखाली आतापर्यंत कार्यरत राहिले आहेत. आता नविन घडामोडीनंतर या दोन्ही गटाच्या भूमिका महत्वाच्या असणार आहेत. जांभळे आणि कारंडे गट हे राष्ट्रवादीतील कट्टर विरोधी गट अलिकडेच एकत्र आले आहेत. यामध्ये मुश्रीफ यांची महत्वाची भूमिका राहिली होती, तर महाविकास आघाडी शासन असताना कारंडे यांना अजित पवार यांच्याकडून मोठे बळ मिळाले होते. त्यामुळे दोन्ही गट यापुढील काळात कोणाचे नेतृत्व स्वीकारणार याबाबत आता उत्सुकता आहे. शिरोळ मध्ये जांभळे व कारंडे गटांचे मनोमिलन झाले आहे याचा राजकारणावर लक्षणीय प्रभाव पडेल व आगामी निवडणुकांवर थेट परिणाम होईल बदलत्या राजकीय पार्श्वभूमीचा फायदा आणि तोटाही तालुक्यातील पक्ष आणि संघटनांना होणार आहे. भाजपने बेरजेचे राजकारण राज्यात केले असले तरी याचे थेट परिणाम तालुक्यातील राजकारणावर येणाऱ्या निवडणुकांमध्ये दिसणार आहेत. जयसिंगपूर, कुरुंदवाड नगरपालिकेसह जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये आजवर एकमेकांचे हाडवैर असणारे नेते आता हातात हात घालून प्रचार करताना दिसणार आहेत. असे असले तरी राज्यातील राजकीय संदर्भाच्या तिखट प्रतिक्रिया कार्यकर्त्यांमधून उमटत होत्या. दरम्यान, माजी आरोग्य राज्यमंत्री आमदार राजेंद्र पाटील- यड्रावकर हे मंत्रिमंडळातील दावेदार मानले जात आहेत. ऐनवेळी राष्ट्रवादीच्या नऊ आमदारांना मंत्रीपदे दिल्याने यड्रावकर यांनाही मंत्रिपदासाठी कस लावावा लागणार आहे. एकूणच बदलत्या राजकीय संदर्भांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ते संभ्रमावस्थेत आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे गट, राष्ट्रवादीच्या पुढील वाटचालीवर राजकारणाला दिशा मिळणार आहे. हातकणंगले मध्ये बदलत्या राजकीय उलथापालथीमुळे हातकणंगले तालुक्यातील पक्षाचे नेते व कार्यकर्ते द्विधा मनस्थितीत असून, ते ‘वेट अँड वॉच"च्या भूमिकेत असल्याचे चित्र आहे. तालुक्यात राष्ट्रवादीची ताकद अल्प असली तरीही निष्ठावंत कार्यकर्ते पक्षाला व हसन मुश्रीफ यांना मानणारे आहेत. भविष्यकाळात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मुश्रीफ यांचे नेतृत्व मानल्यास विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची ताकदीचा फायदा भाजपा, शिवसेना (शिंदे गट ) व जनसुराज्य पक्षाच्या आघाडीच्या उमेदवारास होऊ शकतो. लोकसभेच्या निवडणुकीत कॉंग्रेस, ठाकरे गट यांनाही होवच शकतो.

शाहूवाडी गायकवाड गटाची होणार कोंडी शाहूवाडीत राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते संभ्रमात आहेत. रणवीरसिंग गायकवाड यांचे हसन मुश्रीफ यांच्याशी निकटचे संबंध आहेत. साखर कारखाना व अन्य बाबींचा विचार करता मुश्रीफांना अंतर देणे गायकवाड यांना जिकीरीचे बनले आहे. माजी आमदार सत्यजित पाटील यांच्याशी गायकवाड यांचे जिव्हाळ्याचे संबध पाहता भाजपचे घटकपक्ष असलेल्या जनसुराज्येचे आमदार डॉ. विनय कोरे यांच्याशी त्यांचे गणित जुळत नाही. आगामी लोकसभेसाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पुढे चाल दिली तर रणवीरसिंग गायकवाड इच्छूक आहेत. लोकसभा मतदार संघात जयंत पाटील आणि शिराळ्याचे आमदार मानसिंगराव नाईक या दोघांची शिराळा-वाळव्यात पकड आहे. ते अजितदादा गटाकडे गेले तर लोकसभेच्या रिंगणात इच्छूक उतरण्यापूर्वीच बाहेर होतील. मुश्रीफांच्या मागून गेले तरी शिंदे गट-भाजपाकडून त्यांचा विचार होणे अशक्य आहे. यामुळेच शाहूवाडीत गायकवाड गटाची अवस्था इकडे आड तिकडे विहीर अशी झाली आहे. बदलत्या राजकिय घडामोडीचा गगनबावडा तालुक्याच्या राजकारणावर फारसा प्रभाव पडणार नाही. मात्र, करवीर विधानसभेला याचा परिणाम होऊ शकतो. गगनबावडा तालुक्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप या प्रमुख पक्षासह वेगवेगळे गट कार्यरत आहेत. राष्ट्रवादीचे अनिल साळोखे, जिल्हा बँकेचे माजी चेअरमन पी. जी. शिंदे व विद्यमान अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी राष्ट्रवादी मजबुतीसाठी प्रयत्न केले. शिंदे यांच्यानंतर तालुक्यात राष्ट्रवादीचे काम विद्यमान अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी केले. पक्ष वाढीसाठी त्यांनी प्रयत्न केले. मात्र पक्ष नेतृत्वाने दुर्लक्ष केले. राज्यात ज्या घडामोडी सुरू आहेत त्याची तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी माहिती घेत

आहेत. बदलत्या राजकीय घडामोडीत गगनबावडा तालुक्यातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कोणाला साथ याबाबत अद्याप संभ्रम आहे. पन्हाळा तालुक्यात सध्या जनसुराज्य शक्ती पक्षाचीच सत्ता आहे. पश्चिम भागात माजी आमदार चंद्रदीप नरकें याचे प्राबल्य आहे. पण, तेही शिंदे गटात सामील झाले. जनसुराज्य हा भाजपचा सहयोगी पक्ष आहे. त्यामुळे तालुक्यात जनसुराज्यचा विरोधक म्हणजे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष. पण, आता समिकरणे बदलली. राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर यांनी तालुक्यात पक्ष जिवंत ठेवला आहे. तालुक्यात शिवसेना ठाकरे गट व आसुर्लेकर याचे सख्य आहे. त्यांच्या निर्णयाबाबत शिवसेना ठाकरे गटातही अस्वस्थता आहे. तसे आसुर्लेकर अजित पवार याचे निकटवर्ती समजले जातात. त्यांच्या भूमिकेकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. कालच्या घडामोडीमुळे सरकारमधील भाजपच्या मित्र पक्षातील डॉ. विनय कोरे याना मंत्रीपदासाठी प्रतीक्षा करावी लागणार असे दिसते.

राधानगरीत राष्ट्रवादीच्या एकसंघपणावर थेट परिणाम राष्ट्रवादी कॉंग्रेसने युतीला साथ दिल्यानंतर तालुक्यातील जिल्ह्याध्यक्षपद सांभाळणारे ए. वाय. पाटील हे या बंडा सोबत राहिले. त्यामुळे येथील राष्ट्रवादीच्या एकसंघपणावर थेट परिणाम झाला. कार्यकर्ते बुचकळ्यात पडले. भविष्यात कोणता झेंडा हाती घ्यायचा हा त्यांच्यासमोर प्रश्न पडला. राष्ट्रवादीत ए. वाय. पाटील आणि माजी आमदार के. पी. पाटील हे दोन गट येथे आहेत. माजी आमदार पाटील यांचा गट त्यांचे जावई धैर्यशील पाटील सांभाळून आहेत. या गटाने अद्याप निश्चित धोरण जाहीर केले नाही. मात्र, ते शरद पवार यांच्यासोबत असतील. या निर्णयाने राष्ट्रवादी कॉंग्रेसचा सामान्य कार्यकर्ता अडचणीत सापडला. आगामी विधानसभा निवडणुकीत आमदार प्रकाश आबिटकर यांना शह देण्यासाठी हाच पक्ष खंबीर होता. बदलत्या ताज्या राजकीय घडामोडीमुळे या समीकरणावरही परिणाम झाला आहे. राष्ट्रवादीच्या एकसंघपणावर परिणाम झाला आसून के. पी. पाटील गटाचे अद्याप निश्चित धोरण स्वाकारले नाही. आजरा तालुका हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला मानला जातो. येथे बहुतांश सहकारी संस्थावर राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. राज्यपातळीवरील बदलत्या ताज्या राजकीय घडामोडीमुळे कार्यकर्ते गोंधळले आहेत. तरीही आमदार हसन मुश्रीफ यांना मिळालेल्या मंत्रीपदामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य दिसते. उतूरमधील 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमात याची चाहूल लागली होती. पूर्वीचा कॉंग्रेस व राष्ट्रावादीतील राजकीय संघर्ष अलीकडे राष्ट्रवादी विरूद्ध भाजप असा झाला होता. उतूर जिल्हा परिषदेमध्ये भाजप विरोधी राष्ट्रवादीचा टोकाचा असलेला संघर्ष नव्या राजकीय समिकरणामुळे कमी होण्याची शक्यता आहे. तालुका पातळीवरील कार्यकर्त्यांचे मनोमिलन कसे होणार यावर पुढील राजकीय समिकरणे राहतील. प्रत्येक कार्यकर्त्याला स्वतःच्या राजकीय भवितव्याची चिंता लागून राहिल्याने सुप्त संघर्ष राहणार आहे. पक्ष पातळीवर मिटले तरीही राष्ट्रवादी व भाजपमध्ये तालुक्यात सुप्त संघर्ष कायम राहण्याची चिन्हे दिसतात. भुदरगड तालुक्यात राष्ट्रवादीची मोठी ताकद असून, माजी आमदार के. पी. पाटील म्हणजे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अशी ओळख आहे. यामुळे ते काय निर्णय घेणार यावरच पक्षाचे भवितव्य ठरणार आहे. तर बदलत्या राजकीय उलथापालथीमुळे आमदार प्रकाश आबिटकर यांना मंत्रिपद मिळाले नाही. याबाबत चर्चा रंगली आहे. आमदार आबिटकर यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर 'केपीं'नी मतदारसंघात रान उठविले होते. आता 'के.पीं'च्या भूमिकेवर आमदार आबिटकर काय करणार हा चर्चेचा विषय आहे. गतनिवडणूकीत भाजपमध्ये दाखल झालेल्या राहुल देसाई यांना बदलत्या राजकीय परिस्थितीचा फायदा की तोटा होणार हे काळच ठरविणार असे चित्र आहे. आमदार आबिटकर यांना मंत्रीपद मिळणार का? राहुल देसाई यांचे भवितव्य काळच ठरविणार.

चंदगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर जाण्याच्या निर्णयाचे मतदारसंघातील त्यांच्या कार्यकर्त्यांनी स्वागत केले आहे. महाविकास आघाडी शासनाच्या काळात पवार यांनी चंदगड मतदारसंघासाठी मोठ्या प्रमाणात विकासनिधी दिला होता. सरकार पडल्यानंतर नव्या सरकारकरडून दूर्लक्ष झाले. मात्र पवार पुन्हा सत्तेत आल्यामुळे स्थानिक राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्याचवेळी स्थानिक राजकारणातही फेरबदल होण्याची शक्यता आहे. आगामी निवडणुकीतही नवी आघाडी कायम राहिल्यास आमदार पाटील यांनाच उमेदवारीची जास्त संधी आहे. चार वर्षापासून पक्षाचे काम करणारे शिवाजीराव पाटील आणि नव्याने पक्षात दाखल झालेले संग्रामसिंह कुपेकर यांच्या मार्गात अडथळा निर्माण झाला आहे. शिवसेना उध्दव ठाकरे गट आणि शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना पुन्हा मर्यादा आल्या आहेत. राजकारणातील नवे बदल कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांसाठी संभ्रम निर्माण करणारे आहेत. शिवाजीराव पाटील, संग्रामसिंह कुपेकर यांच्या मार्गात अडथळे ठाकरे गट, शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना आहेत. गडहिंग्लज राष्ट्रवादीसमोर पर्याय शोधण्याचे आव्हान आमदार राजेश पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साथ देण्याचे नक्की केले. आता माजी आमदार संध्यादेवी कुपेकर शरद पवार यांच्यासोबत राहण्याची शक्यता आहे. परंतु, गतवेळी त्यांनी विधानसभा निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतल्याने त्या राजकारणात पुन्हा येतात की नाही. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत या घडामोडीचे पडसाद उमटतील. मुळात काही वर्षापासून तालुक्यात कुपेकर व पाटील असे दोन गट कार्यरत आहेत. श्रीमती कुपेकरांचा सकारात्मक निर्णय झाल्यास त्यांच्या गटाला नवी संजीवनी मिळेल. कुपेकरांबरोबरच त्यांच्या कन्या नंदिनी बाभूळकर, अप्पी पाटील यांचा चेहराही नव्या रचनेत पुढे आणण्याचा पर्याय राष्ट्रवादीसमोर आहे. आमदार राजेश पाटील यांची होणार बेरीज - संग्राम कुपेकर, समरजित घाटगेंच्या भूमिकेकडे लक्ष लागून राहिले आहे.

**निष्कर्ष :-**

राजकीय आखाड्यात एकमेकांचे विरोधक असलेले कोल्हपुरमधील नेते एकाच व्यासपीठावर विधायक कामासाठी एकत्र आलेले दिसून येतात. मात्र ते व्यासपीठावर एकमेकांच्या विरुद्ध दिशेला बसले दिसून येतात हे सुद्धा चित्र पहावयास मिळेल. व्यासपीठावर शाहू छत्रपती, पालकमंत्री हसन मुश्रीफ, माजी पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार सतेज पाटील, आमदार पी. एन. पाटील, आमदार जयंत आसगावकर, आमदार जयश्री जाधव, खासदार संजय मंडलिक, धनंजय महाडिक, धैर्यशील माने, माजी आमदार मालोजी छत्रपती, माजी आमदार चंद्रदीप नरके, के. पी. पाटील, व्ही. बी. पाटील एकाच व्यासपीठावर उपस्थित होते. यामध्ये एकमेकांचे विरोधक चंद्रदीप नरके एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला पी. एन. पाटील बसले होते. खासदार महाडिक आणि आमदार सतेज पाटील एकाच व्यासपीठावर मात्र एकमेकांच्या विरुद्ध दिशेला बसले होते. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर कोण निवडणुकीच्या आखाड्यात उतरणार आहेत. हे बदलत्या राजकीय समीकरनातून बदलणार आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारीसंबंधी कोणताच राजकीय पक्ष भाष्य करताना दिसत नाही. गोकुळ आसो किंवा इतर सहकारी सस्थां असोत यांच्या निवडणुकीत आणि स्थानिक आघाडी मात्र वेगळी झालेली पहावयास मिळते.लोकसभा जे नेते एकत्र असतात ते विधानसभेला वेगळे होताना दिसतील किवा जिल्यातील पंचायत राज्य व्यवस्था मध्ये वेगळीच स्थानिक आघाड्या दिसून येते.

**निवडक संदर्भसूची**

१) चौधरी राजेश, अशोक दत्तात्रेय, (1999) 'ग्रामपंचायत अधिनियम 1958',18 वी आवृत्ती

२) महाराष्ट्र शासन (विधी व न्याय विभाग), (1961)'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम'

३) महाराष्ट्र शासन (ग्रामविकास व जलसंधारण विभाग),( 1959) 'मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम,

४) पाटील पी. बी. (2000) 'पंचायत राज्याकडून ग्रामस्वराज्याकडे' ( समाजवादी प्रबोधनी, इचलकरंजी)

५) महाराष्ट्र शासन (ग्रामविकास व जलसंधारण विभाग), (2011) 'पंचायत राज्य संस्थेकरिता ग्रामस्थांची सनद' (भाग १ व २)

६) नरसिंहराव पी. व्ही. (3 जुलै, 1993), ' पंचायत राज्य संस्थेचे पुनरज्जीवन'

७) चौधरी द.ह., (1999) महाराष्ट्र नगर परिषदा निवडणूक अधिनियम

८) पाटील बी.बी.,(2014), महाराष्ट्र शासन व राजकारण (फडके प्रकाशन,कोल्हापूर)

९) कुलकर्णी प्रसाद माधव (संपादक) , (2009), पंचायत राज्य कडून लोकराज्याकडे (स्वातंत्र्य दिन विशेषांक, प्रबोधनी प्रकाशन ज्योती इचलकरंजी)

१०) इंटरनेट वरील माहितीचा गरजेनुसार वापर